श्री राम चंद्र मिशन®


सप्टेंबर २०१०    खंड ३ अंक ५

India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY

केवळ खाजगी वितरणाकरिता

# पूज्य गुरुदेवांचा ८४वा जन्मदिवस समारोह

## दि.२३ ते २६ जुलै, २०१०, लखनऊ



गुरुदेव लखनऊ येथे अभ्यासींना संबोधित करित असतांना, जुलै २०१०

लखनऊचा आश्रम हा सुमारे ६० एकर जमीन व अभ्यासींकरिता नियोजित निवासी वसाहत असलेला भारतातील सर्वात मोठ्या आश्रमांपैकी एक आहे. साधारणपणे या काळात पडणाऱ्या जोरदार पावसाचा सामना करण्यासाठी येथे मोठ्या प्रमाणावर पूर्वतयारी करण्यात आली होती. जल–निस्सारण व्यवस्थेसह असणाऱ्या काँक्रीटच्या रस्त्यांमुळे अभ्यासींची परिसरात फिरण्यासाठी मोठ्याप्रमाणावर सोय झाली होती. ध्यान–कक्ष, भोजन–कक्ष, उपाहार–गृहे व विविध विक्रीकेंद्रांसाठी पावसापासून संरक्षण होईल असे निवारे तयार करण्यात आले होते.

दि. २१ जुलै रोजी दुपारी पूज्य गुरुदेवांचे लखनऊ येथे आगमन झाले. सुमारे १५००० अभ्यासी या प्रसंगी पूज्य गुरुदेवांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. त्या दिवशी संध्याकाळी, नवीन बांधलेला ध्यान–कक्ष गुरुदेवांनी पूज्य बाबूजी







महाराजांना समर्पित केला. सुमारे ३००० व्यक्तींना बसता येईल अशी क्षमता असणाऱ्या या भवनाचे क्षेत्रफळ १५००० चौ. फूट आहे.

दि. २३ जुलै रोजी प्रारंभ झालेल्या या समारंभाची मध्यवर्ती कल्पना होती 'प्रेम आणि कृतज्ञता'. भारतातील तसेच भारताबाहेरील सुमारे ४०,००० प्रतिनिधी या सोहोळ्यात सहभागी झाले होते. गुरुदेवांनी संपन्न केलेले एकूण २४ विवाह हा या समारंभाचे एक महत्वाचे अंग होते. विचारांना चालना देणारी तीन भाषणे गुरुदेवांनी या समारंभात दिली. दि. २४ जुलै रोजी 'सहज–मार्गाची असीमतेकडे वाटचाल' याबद्दल बोलताना गुरुदेव म्हणाले–

★सहज मार्गात ४६ वर्षे व्यतीत करून सुद्धा मी अजूनही अनंत अशा प्रवासात आहे. सहज मार्गात आपण असीमतेकडे मार्गक्रमण करीत असतो. असीमतेवर विजय प्राप्त करून तिला आपल्या मुठीत बद्ध करणे हे आपले काम आहे.

★आपली अशी समजूत असते की गुरुदेव आपल्यासाठी सर्व काही करतील, परंतु आपले सहकार्य १०० टक्के असले पाहिजे. तरच गुरुदेवांची मदत १००० टक्के मिळेल.

★केवळ साधना हे आपले उद्दिष्ट नाही तर साधनेद्वारा आपण आपले जास्तीत जास्त अवलंबन आपल्या गुरुदेवांवर होईल हे पहात असतो.

दि. २५ जुलै, गुरुपौर्णिमेच्या दिवशी सकाळच्या भाषणांत गुरुदेव म्हणाले,

★या दिवशी जे कोणी आपल्या गुरूंच्या सान्निध्यात आहेत, त्यांची झपाट्याने प्रगती होईल.

★आपल्या प्रगतीसाठी आपण आपल्या कार्याची गरज व जबाबदारीविषयी जागरुक असले पाहिजे.

हे भाषण करतांना तसेच त्यानंतर व संध्याकाळीसुद्धा पूज्य गुरुदेवांना श्वासोश्वासाचा त्रास होत होता. या परिस्थितीमध्ये ते काही अभ्यासींना म्हणाले की " मी आजारी आहे किंवा नाही हे मला माहित नाही पण मी निरोगी नाही हे निश्चित".

दि. २६ जुलै रोजी समारोपाच्या भाषणात गुरुदेव म्हणाले,

★जसे पूज्य बाबूजी महाराज नेहमी म्हणायचे की फक्त एकाच गोष्टीला अंत नाही आणि ती म्हणजे अध्यात्मिक जीवन, कारण आत्मा हा दिव्यत्वाचा अंश असून तो अविनाशी व चिरस्थायी आहे.

★पूज्य बाबूजी महाराजांनी सांगितल्याप्रमाणे मानवी जीवनात 'ममता'(मातेचे प्रेम) हे सर्वात पवित्र आहे. त्यामुळे आपल्या गुरूचा आपली आई म्हणून स्विकार केला पाहिजे.

★निरपेक्षपणे व कुठल्याही फळाची अपेक्षा न ठेवता, जेव्हा आपण सेवा करतो, ती खरी शुद्ध सेवा होय. गुरुदेवांच्या ह्रुदयाकडे जाण्याचा सर्वात सोपा मार्ग





म्हणजे सेवा. गुरुदेवांना आपल्या सेवेची गरज नसते. एखादे मूल ज्याप्रमाणे आईबरोबर राहून आईला मदत करते व शेवटी ते आईशी एकरूप होते तशी सेवा नैसर्गिक असावी.

सकाळच्या व संध्याकाळच्या सत्रांमध्ये भगिनी अपर्णा घोष, रंजना मेहता, मीना मिश्रा व बंधू गुरप्रीत यांनी अनेक सुश्राव्य भजने सादर केली. याबरोबरच भगिनी के. सौम्या यांचे भरतनाट्यम, बरोडा केंद्राच्या अभ्यासींनी सादर केलेले संत कबीरांच्या जीवनावर आधारित नाटक व रशियन अभ्यासींनी सादर केलेला संगीताचा कार्यक्रम यावेळी प्रस्तुत करण्यात आला.

हा समारोहाने 'स्मृती', 'क्रेस्ट', 'व्हि.बी.एस.ई.', 'एस.एच.पी.टी.', एकोज वार्तापत्र, वेबसाईट व आय.टी. यासर्व क्षेत्रात काम करणाऱ्या अभ्यासींच्या चमुंना एकत्र भेटण्याची व पुढील वर्षीच्या कामाचे नियोजन करण्याची संधी दिली. मिशनच्या कार्यकारी समितीच्या बैठकीनंतर पूज्य गुरुदेव नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'व्हिस्पर्स फ्रॉम दि ब्राईटर वर्ल्ड– थर्ड रिविलेशन' याचा संदर्भ घेऊन म्हणाले, "येथे जे काही घडते ते त्यांना ठाऊक असते. हे एखाद्या माशांच्या टाकीप्रमाणे आहे. आपण सर्व आतमध्ये आहोत व ते आपल्याला बाहेरून बघत आहेत."आपल्या प्रकृतीबद्दल व कामाच्या दबावाबद्दल ते म्हणाले, की ज्यावेळी गरज होती त्यावेळी बाबूजी महाराज ब्रिटीश वकिलातीचे कित्येक मजले स्वतः चढून गेले होते व म्हणाले होते "मी दुर्बल असेन वा अशिक्षित असेन, पण वेळप्रसंगी आवश्यकतेनुसार मी काहीही करु शकतो!" यावर गुरुदेव म्हणाले, "माझ्या गुरुदेवांनी जे केले त्याचा शतांश वा सहस्त्रांश भाग साध्य करण्याचा प्रयत्न मी करायला नको का?"

जगभरातून आलेल्या अभ्यासी व मिशनच्या पदधिकाऱ्यांना भेटून त्यांच्याशी मिशनच्या कामाबद्दल चर्चा करण्यासाठी व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पूज्य गुरुदेवांनी वेळ तर काढलाच पण याचवेळी आपल्या लहानग्यांसह आलेल्या अभ्यासींना भेटून त्यांच्या वैयक्तिक समस्या व प्रश्नांकडे लक्ष पुरवणे ही कामेही गुरुदेवांनी या वेळी केली.

नेहमीप्रमाणे बालकेंद्रामध्ये(चिल्ड्रेन्स सेन्टर) कार्यक्रमांची रेलचेल व हर्षोल्हासाचे वातावरण होते. जादूचे प्रयोग, कठपुतळीचा खेळ, चित्रकला, हस्तकला यांच्या माध्यमातून सुमारे ४२०० मुलांचे मनोरंजन करण्यात आले.

उत्कृष्टपणे आयोजित केलेल्या या सोहोळ्याची शाश्वत स्मृती म्हणजे जराही न थकता, अविरत कष्टणाऱ्या, स्वतःच्या प्रकृतिची पर्वा न करता आपल्या अपत्यांची एकत्रितपणे व स्वतंत्रपणे काळजी घेणाऱ्या आईच्या स्वरूपातील प्रिय गुरुदेवांचे दर्शन होय.


भोजनगृह


ध्यानकक्ष


बालकेंद्र



## गुरुदेवांचा प्रवास

### चेन्नई

पूज्य गुरुदेवांनी बराचसा काळ विश्रांती घेण्यात व आश्रम ते घर अश्या फेऱ्या करत घालवला. 'गायत्री' या आपल्या निवासस्थानी दररोज सकाळी व सायंकाळी त्यांनी आलेल्या पाहुण्यांच्या भेटी घेतल्या व सत्संगांचे संचालन केले. त्यांनी मरिना बीचला भेट देऊन तेथेही अभ्यासींशी चर्चा करण्यात व त्यांचे शंकासमाधान करण्यात वेळ खर्च केला. अभ्यासीची भूमिका व आयुष्याबद्दल अपेक्षा याबद्दल पृच्छा केली असता गुरुदेव स्पष्टपणे म्हणाले, "जे जरूरी आहे ते कुठल्याही फळाची अपेक्षा न ठेवता केलेच पाहिजे. हे कर्मयोगाचे सार आहे." सुमारे एक तास अभ्यासींबरोबर हास्य–विनोद करुन, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन व आईस्क्रीमचा आस्वाद घेऊन पूज्य गुरुदेव घरी जाण्याकरिता निघत असत. काळाने काही वेळासाठी तरी स्तब्ध रहावे व गुरुदेवांबरोबर अधिक समय व्यतीत करता यावा अशी मनोमन इच्छा मनात बाळगून उपस्थित अभ्यासी गुरुदेवांना निरोप देत असत. ओमेगा शाळेला भेटी दिल्यानंतर गुरुदेवांनी दि. ८ जुलै रोजी कोलकाता येथे जाण्याकरिता प्रस्थान केले.

### सिलिगुडी, पश्चिम बंगाल

दि. ९ व ११ जुलै रोजी गुरुदेवांनी सिलिगुडी केंद्राला भेट दिली. बागडोगरा येथे गुरुदेवांचे आगमन झाले तेव्हा स्थानिक तसेच जवळपासच्या केंद्रांतील व नेपाळमधील अभ्यासींनी त्यांचे स्वागत केले.







नुकतेच नेपाळ प्रजासत्ताक देशामध्ये आपली संस्था पंजीकृत करण्यात आली आणि तेथील संस्थेच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना गुरुदेव लिहितात, "नेपाळच्या लोकांना त्यांच्या चेतनेमध्ये जरी याची जाणीव नसली, तरी हा दिवस नेपाळसाठी खूप मोठा दिवस आहे. आता आपणाला प्रामाणिकता, प्रेम आणि समर्पणाने खरी अध्यात्मिक सेवा या लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कंबर कसली पाहिजे." त्याचबरोबर दि. १० जुलै रोजी नेपाळच्या मिशनच्या संचालक मंडळाची प्रथम बैठक तसेच सदस्यांच्या सर्वसाधारण सभेची पहिली बैठक सिलिगुरी आश्रममध्ये झाली.

दि. ११ तारखेला सकाळी ध्यानकक्षाचे उद्घाटन झाले त्याप्रसंगी बोलताना गुरुदेवांनी अभ्यासींच्या बाह्यबदलावर व व्यवहार सुधारण्यावर भर दिला व म्हणाले कि जोपर्यंत हे होत नाही तोपर्यंत बाकी सर्वकाही वाया जाईल. ते पुढे म्हणाले, "गेल्या ४० वर्षांपासून मी पहात आहे कि सहजमार्गामध्ये मानवतेच्या अनुशंगाने आपण प्रगती करीत नाही आहोत. आपण आतून, अध्यात्मिकरित्या, कसे आहोत हे गुरुदेवांना माहिती आहे परंतु आपण जसे आत आहोत तसेच बाहेरही असले पाहिजे. आपल्या आत व बाहेर समानता असली पाहिजे, आपले विचार व कृती एकच असली पाहिजे, आपण जे बोलतो तसेच वागले पाहिजे आणि जे वागतो तसेच बोलले पाहिजे. एका अभ्यासीच्या या एका मूलभूत गरजेवरती आपले प्रशिक्षक भर देत नाहीत असे मला वाटते."

'एस. एम. एस. एफ.' तर्फे या सिलिगुरी आश्रमामध्ये जेवण व राहणे मोफत राहील असे गुरुदेवांनी जाहीर केले. पूर्व व उत्तरपूर्व राज्यातील अभ्यासी याचा रिट्रीट सेंटरसारखा उपयोग करतील व येथे कमीतकमी ३-४ स्थानिक सम्मेलने होतील अशी आशाही प्रकट केली.

दि. ११ तारखेला दुपारी गुरुदेव कलकत्त्याकडे रवाना झाले. कलकत्ता आश्रमामध्ये राहण्याआधी दोन दिवस ते बंधू अजय भट्टर यांच्या घरी राहिले. दि १४ ते १९ जुलै दरम्यान रशिया व इतर 'सीआयएस' देशातील सुमारे ३०० अभ्यासींसाठी एका सम्मेलनाचे आयोजन केले होते. स ६:०० ते रात्री ९:०० पर्यंतच्या दैनंदिनीमध्ये सत्संग, व्यक्तिगत बैठका, विविध विषयांवर भाषणे आणि सामुहिक चर्चा यांचा समावेश होता. गुरुदेव सायंकाळच्या वेळी अभ्यासींसमवेत त्यांच्या कक्षाच्या अंगणात वेळ व्यतीत करीत असत. त्यांनी अभ्यासींच्या प्रश्नांना उत्तरे दिली, त्यांच्या शंकाचे समाधान केले आणि बऱ्याच सखोल शिकवणींनी भरपूर अशा घटना सांगितल्या.

सम्मेलनामध्ये अभ्यासींनी दिलेली 'बदलण्याची इच्छा', 'सहज मार्ग साधना', 'विचार शक्ती' अशा विषयांवर भाषणे सामील होती. या भाषणामुळे साधनेच्या सूक्ष्म बाबींवर व आपल्या दैनंदीन जीवनावर त्यांचा प्रभाव यावर प्रकाश पडला.

सहिष्णुता व सहकार याबाबतीत हे पाहुणे अभ्यासी वाखाणण्याजोगे होते. कलकत्त्यामधील उष्मा, दमट हवामान व त्यामुळे उद्भवणारा आजार या गोष्टी त्यांना खूपच कष्टदायक होत्या. तरीही त्यांनी या गोष्टींचा अडथळा होऊन त्यांच्या या गुरुदेवांसमवेत भेटीच्या उद्देशामध्ये काही बाधा येऊ न देण्याची निष्ठा दर्शवून दिली.

## जयपूर



लखनऊ समारोह आटोपल्यानंतर पू. गुरुदेव दिल्लीला काही काळ थांबले व त्यानंतर गुरगावमार्गे ते रस्त्याने प्रवास करुन दि. २९ जुलै रोजी जयपूर येथे पोहोचले. जयपूर येथे सुमारे ३०० अभ्यासींनी पूज्य गुरुदेवांचे प्रेमपूर्वक स्वागत केले व यावेळी गुरुदेवांनी त्यांच्यासाठी बांधलेल्या नविन कक्षाचे उद्घाटन केले. कक्षाच्या बांधकामाविषयी विविध माहिती विचारतच त्यांनी आतमध्ये एक फेरफटका मारला. ते म्हणाले की रस्त्याने प्रवास केल्यानंतर त्यांना नेहमीच ताजेतवाने वाटते परंतु अगदी एक तासाच्या विमानप्रवासानेदेखिल त्यांना लगेच थकवा येतो. यावेळी त्यांनी व्हरांड्यामध्ये बसून जमलेल्या अभ्यासींशी संवाद साधला.

संध्याकाळी ते आपल्या कक्षातुन बाहेर आले व बाहेरील हिरवळीवर सुमारे तासभर बसले. यावेळी अनौपचारिक संभाषणामध्ये ते म्हणाले की कुठल्याही






जयपूर: ध्यानकक्ष


जयपूर: गुरुदेवांच्या कुटीरासमोरच्या हिरवळीवर

परिस्थितीमध्ये ते आनंदी असतांत. प्रत्येकाने सर्वप्रकारच्या परिस्थितीमध्ये नेहमीच आनंदी राहिले पाहिजे.

दि. ३० रोजी, गुरुदेवांनी नवीन ध्यानकक्षाचे उद्घाटन केले व त्यास आपले गुरुदेव पूज्य बाबूजी महाराजांना समर्पित केले. सकाळी ९ वाजता त्यांनी सत्संगाचे संचालन केले. यावेळी राजस्थान, जवळपासचे राज्ये व परदेशातील सुमारे १५०० अभ्यासी ऊपस्थित होते. सत्संगानंतर त्यांनी गोल्फकार्टमधून आश्रमामध्ये एक फेरी मारली. यावेळी गावातील सरपंच व इतरांनी पूज्य गुरुदेवांचे पारंपारिक पद्धतीने स्वागत केले. पूज्य गुरुदेवांनी त्यांना प्रसाद देऊन आशिर्वाद दिला.

संध्याकाळी पूज्य गुरुदेव बाहेरील हिरवळीवर सुमारे १ तास येऊन बसले होते यावेळी त्यांनी अनेक अभ्यासींशी संवाद साधला तसेच लहान मुलांच्या कविता व गाणी ऐकली व अभ्यासींच्या प्रश्नांना व शंकाना उत्तरे दिली.

दि. ३१ रोजी सकाळी त्यांनी सत्संगाचे संचालन केले. संध्याकाळी त्यांनी उपस्थित असलेल्या सुमारे २०० परदेशी अभ्यासींना त्यांच्या कक्षात सिटींगसाठी आमंत्रित केले.

दि. १ ऑगस्ट रोजी पूज्य गुरुदेवांनी सकाळच्या सत्संगाचे संचालन केले. भगिनी रंजनांनी सादर केलेल्या भजनांनंतर त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. यानंतर त्यांनी आश्रमामध्ये फेरफटका मारला व जवळच असलेल्या अभ्यासींच्या निवासी संकुलास (मास्टर्स क्रिएशन) भेट दिली. आश्रमाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे १० एकर आहे व निवासी संकुलाचे क्षेत्रफळ सुमारे २० एकर आहे.

दिवसभर पूज्य गुरुदेव अनेक अभ्यासींना भेटत होते. दुपारी ३ वाजता ते मुंबईला जाण्यासाठी विमानतळावर निघाले. त्यांच्या संपूर्ण मुक्कामादरम्यांन ते आपल्या कार्यालयीन कामामध्ये, आलेल्या ई-मेलना उत्तरे देण्यात व इतर प्रशासकीय कामे करण्यात व नवीन प्रशिक्षक बनविण्याच्या कामातसुद्धा व्यस्त होते.

## मुंबई

मुंबईच्या अभ्यासींना त्यावेळी एक सुखद आश्चर्याचा धक्का बसला ज्यावेळी पूज्य गुरुदेवांनी दि. १ ऑगस्ट रोजी मुंबईला भेट देण्याचे निश्चीत केले. अनेक अभ्यासी नुकतेच लखनऊहुन परत आले होते व जोरदार पाऊस असूनसुद्धा सर्वांनी पूज्य गुरुदेवांच्या स्वागताची तयारी सुरु केली. मुंबई व परिसरातील सुमारे १५०० अभ्यासी पनवेल आश्रमामध्ये एकत्रित झाले होते.

पूज्य गुरुदेव जयपूरहून संध्याकाळी ७.२० वा. विमानाने आले व लगेचच आश्रमाकडे रवाना झाले. आश्रमांत त्यांचे स्वागत तरुण व उत्साही अभ्यासींनी त्यांच्यासाठी खास बनविलेल्या गाण्याने केले. यावेळी गुरुदेव अतिशय आनंदी व समाधानी दिसत होते. त्यांना विश्रांतीची गरज असतांनाही त्याकडे दुर्लक्ष करुन गुरुदेव म्हणाले की मला प्रथम माझ्या अभ्यासींना भेटावयाचे आहे. आपल्या प्रेमळ गुरुदेवांची एक झलक पहाण्यासाठी आतुर झालेल्या हृदयांच्या आर्ततेला शांत करण्यासाठी ते काहीवेळ भोजनगृहात येउन बसले.

दुसऱ्या दिवशी सकाळी ध्यानकक्षाला लागून असलेल्या गच्चीवर सकाळी ७.३० वा. येऊन गुरुदेवांनी प्रत्येकाला आश्चर्याचा सुखद धक्का दिला. त्यांनी सकाळच्या थंड हवेचा काहीवेळ आनंद घेतला व त्यानंतर ते सरळ ध्यानकक्षामध्ये सत्संगाचे संचालन करण्यासाठी आले जो सुमारे एक तास चालला. संपूर्ण दिवस गुरुदेव अभ्यासींच्या भेटी घेण्यात व त्यांचे काम करण्यात व्यस्त होते. दुपारी साडेतीन वाजता अभ्यासींनी गुरुदेवांना सर्वांसह चहापानासाठी भोजनगृहामध्ये आमंत्रित केले होते. गुरुदेव सर्वांसोबत सुमारे अर्धातास बसले व त्यांनी कॉफीसह देण्यात आलेल्या पदार्थांचा आस्वाद घेतला. संध्याकाळी ५.३० वाजता गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले.

दि. ३ रोजी सकाळी साडेसात वाजता गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर एक लग्न लावले. यानंतर गुरुदेवांनी साधेपणा व समाधान याची आवश्यकता अधोरेखित करणारे व विचारांना प्रवृत्त करणारे असे सखोल भाषण दिले. त्यानंतर गुरुदेव काही खाजगी भेटींकरता रवाना झाले व नंतर दि. ५ रोजी ते चेन्नईसाठी रवाना झाले.

## चेन्नई

लखनौमधील गुरुदेवांच्या जन्मदिनानंतर दि. ५ ऑगस्ट रोजी ते चेन्नईला परतले. रविवार दि. ८ जुलै रोजी गुरुदेवांनी सत्संग दिला आणि त्याचा आनंद अभ्यासींच्या चेहऱ्यावर स्वच्छ दिसत होता. दि ९ रोजी ते गायत्री येथे गेले आणि सायंकाळच्या वेळी ते 'अभ्यासींचे कर्तव्य' आणि 'निरनिराळ्या संस्कृती' यांवर ते चर्चा करीत.

दि. १४ तारखेला सायंकाळी त्यांनी ओमेगा शाळेच्या वसतिगृहाला भेट दिली व तेथेच रात्रीचे भोजन केले. गुरुदेव खूपच आनंदी दिसत होते आणि त्यांनी मुलांच्या प्रश्नांना उत्तरे देत, भाषणामध्ये आणि नुकत्याच एका आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये विजय मिळवून आलेल्या मुलांच्या गीतांचा आनंद घेत बराच वेळ व्यतीत केला. संगीताबद्दल बोलताना ते म्हणाले की संगीत आत्म्यासाठी खुराक आहे आणि शाळेमध्ये भरपूर संगीत व गाणी गायली जातील असा विश्वास त्यांनी दर्शविला. प्रत्येकजण गुरुदेवांसमवेत वेळ मिळाल्यामुळे खूपच भाग्यवंत होता.

ऑगस्ट १६ ते २० दरम्यान उत्तर अमेरिकेहून सुमारे ८०० अभ्यासी व २०० मुले उत्तर अमेरिकेच्या सम्मेलनासाठी मणपाक्कम येथे आले होते. गुरुदेवांसमवेत


पनवेल आश्रम


ओमेगा शाळेच्या वसतिगृहातील मुलांसोबत

श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

सत्संग व त्यांच्याशी हितगुज ही या सम्मेलनामधील ठळक वैशिष्ट्ये होती. बंधू कन्नन आणि बंधू पी. आर. कृष्णा यांचे भाषण, संस्थेच्या अमेरिका आणि कॅनडा मधील सर्वसाधारण सभेसमवेत बैठका, नवीन अभ्यासी, प्रशिक्षक व कर्मचारी मंडळासमवेत बैठका, ओमेगा शाळेला भेटी, प्रश्नोत्तराचे सत्र, व उ.अमेरिकेच्या अभ्यासी व मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम ही देखील या सम्मेलनाचे काही वैशिष्ट्ये होती.

एखाद्या परिकथेप्रमाणे पहिल्या सत्संगामध्येच जणू एक जादू फेकली गेली ज्याने नाहक विचार व घराच्या काळजींपासून सहजगत्या सुटका झाल्यासारखे वाटले. सर्वसाधारण सभेला संबोधताना ते म्हणाले की आपल्याला कामाच्या बऱ्याच संधी उपलब्ध आहेत ज्या आपण बळकावल्या पाहिजेत व त्या साठवून ठेवता कामा नये. जसे खारी त्यांना मिळालेले दाणे कोठेतरी पुरुन ठेवतात आणि ते थंडीच्या वा हिमपाताच्या दिवसात सहसा त्या त्याच जमविलेल्या व न खालेल्या साद्याजवळ त्या मरुन पडलेल्या आढळतात.


या सम्मेलनादरम्यान गुरुदेवांच्या कॉटेजचे दरवाजे काही तासांसाठी खुले ठेवले जात असत जेणेकरुन सर्वांनाच त्यांच्या जवळ जाण्याची संधी मिळाली. "बंधू भगिनिंनो, आपल्या देशाला बदलायचे असेल तर त्याची सुरुवात व शेवट हा आपल्यामध्येच आहे. आपले हृदय पूर्णपणे उघडे ठेवा आणि ते कधीही पुन्हा बंद होऊ देऊ नका." २० ऑगस्ट रोजी सम्मेलनाचे समापन झाले. अभ्यासींची हृदये गुरुदेवांच्या प्रेमपूर्वक आशिर्वादाने काठोकाठ भरलेली होती व मनामध्ये गुरुदेवांबरोबर आणखी जास्त काळ व्यतीत करण्याची इच्छा होती.



## नवीन प्रकाशने


लखनौमधील जन्मदिन समारोहाच्या प्रसंगी बरीच नवीन प्रकाशने प्रकाशित केली गेली. त्या पुस्तकांची यादी खाली दिली आहे.

सहज मार्गांच्या दहा नियमांचे स्पष्टीकरण अतिशय साध्या शब्दांत जर्मनीच्या भगिनी ब्रिगेट स्मिथ यांनी मुले व पालकांसाठी सोदाहरण लिहिलेले आहे.








हबल बबल मधील भाषणांचे उतारे, व ही, हुक़्का ॲन्ड आय या मालिकेतील दुसऱ्या भागाचे एकाच वेळी ६ भाषांमध्ये अनुवादः प्रकाशित झाले – मराठी, गुजराती, कन्नड, तामिळ, तेलुगु आणि मल्याळी.





सहजमार्ग काय आहे?
स्पॅनिश





त्यांच्या पावलांचे अनुसरण
भाग एक – इटालियन





प्रशिक्षक मार्गदर्शिका





अध्यात्माची हाक
भाग १ व २ – इंग्लिश




मानव विकासात सदगुरुची भूमिका – आसामी





गुरु व लक्ष्य
हिन्दी




हृदयीचे बोल - २००५
हिन्दी





सत्योदय
नेपाळी




लिव्ज फ्रॉम द ट्री ऑफ लाइफ – इंग्लिश




प्रिसेप्टर्स जरनल




युथ डायरी

# भूतकाळाचे पुनरावलोकन

## पूज्य लालाजी महाराज जन्मशताब्दी समारोह मद्रास १९७३





पू. गुरुदेवांनी या प्रसंगाचे वर्णन अतिशय सुंदररित्या आपल्या डायरीमध्ये केले आहे जे पुढे 'त्यांच्या पावलांचे अनुसरण खंड २' मध्ये प्रकाशित झाले. या समारोहाची सुरुवात एका प्रार्थनेच्या गाण्याने झाली जे आपल्या प्रिय मामींच्या नेतृत्वाखाली एका समुहाने गायले होते. यावेळी गुरुदेवांनी बाबूजींना या कार्यक्रमासाठी खास मदुराईहून आणलेला मोगरा व गुलाबाचा हार घातला. यावेळी लालाजी महाराजांच्या कृतींचा समावेश असलेले “सत्योदय” प्रकाशित करण्यात आले. सगळ्या ५०० प्रती, प्रत्येकी रु. १० प्रमाणे, प्रकाशनानंतर हातोहात विकल्या गेल्या.

गुरुदेवांना आठवले की यावेळी बाबूजी महाराजांनी आपला संदेश वाचून दाखविला होता जो नंतर विषेश शताब्दी स्मरणिकेमध्ये छापून आला होता व ते म्हणाले “त्यांनी तयार केलेले छापील भाषण सुमारे २० मिनीटे वाचून दाखवले व दोनवेळा लालाजींचा उल्लेख येतांच त्यांचा गळा भावनेने भरुन आला, एकवेळा डोळ्यातुन अश्रु ओघळले व वाचन पुढे सुरु करण्याअगोदर त्यांना ते आधी पुसण्यासाठी थांबावे लागले. त्यांचे त्यांच्या गुरुदेवांप्रती केवढे हे प्रेम व समर्पण. आपण आपल्या गुरुदेवांसाठी त्याचे अनुकरण करु शकतो काय ?

बाबुजींच्या संदेशामुळे ज्या भावना आमच्या मनात निर्माण झाल्या त्या शब्दात व्यक्त करता येण्यासारख्या नाहीत. त्या आम्हाला आमच्या हृदयामध्ये खोलवर जाऊन जीवनाच्या खऱ्या उद्दिष्टाविषयी सतत आठवण करुन देतात व आमच्या प्रेमस्वरुप गुरुदेवांशी असलेल्या अतूट व अनंत संबंधांची सतत आठवण करून देतात.

गुरुदेवांना आठवले की ज्या पद्धतीने हा समारोह आयोजित केला गेला त्याविषयी बाबूजी महाराजांना खूपच आनंद झाला होता व याविषयी दि. २७ फेब्रुवारी १९७३ रोजी ते लिहितात “गुरुदेव संध्याकाळी गायत्रीमध्ये आले व जेव्हा आम्ही एकटेच होतो तेव्हा मला आलिंगन देऊन म्हणाले 'मी तुझ्यावर खूप खुष आहे. तु एक फार मोठे काम केले आहेस.' आपण आशा व प्रार्थना करुया की आपण आपल्या प्रेम, भक्ती व कटिबद्धतेने आपल्या गुरुदेवांच्या हृदयामध्ये असा आनंद निर्माण करु शकू.

### यावेळच्या बाबूजी महाराजांच्या संदेशातील एक उतारा

“फक्त आपल्या सदगुरुमध्येच लय राहून अध्यात्मिक उन्नतीला पोषक ठरणारी लयावस्था मिळविण्याकरिता या प्रसंगाचा आपण उपयोग करुन घेतला पाहिजे. आपले स्मरण अशा स्तरावर गेले पाहिजे की, सगळीकडे सर्व वस्तूंमधून स्मरणाचा विचारच पाझरत आहे अशी भावना झाली पाहिजे! तेच मानवाला शक्य असणारे खरे स्मरण होय. आपले खरे हितसुद्धा त्यातच आहे.

जीवनाची समस्या सोप्या तऱ्हेने सोडवावयाची असेल तर मनाला योग्य सूचना दिल्या पाहिजेत. आपल्याला योग्य वळण लावून सवय केल्यास आपणाला ते शक्य होते. आपली स्वतःची मूळ अवस्था ईश्वरीय असल्यामुळे, त्या अवस्थेतच रहाणे फार सोपे असते. आपली उत्क्रांती घडवून आणणारी ही खात्रीची प्रक्रिया आहे. परमतत्वाच्या प्राप्तीकडे थोडासा जरी कल वळविला तरी आपले भविष्य उज्ज्वल होण्यास प्रारंभ होईल.”

## अखिल भारतीय निबंध लेखन उपक्रम, २०१०

हा उपक्रम मिशनतर्फे संयुक्त राष्ट्रांच्या भारत व भूतानसाठीच्या माहितीकेंद्राच्या समवेत संयुक्त राष्ट्रसंघाच्या युवावर्षाच्या (सन २०१०–२०११) निमीत्ताने आयोजित करण्यात येत आहे. विद्यार्थी खालिल भाषांमध्ये निबंध लिहू शकतात इंग्लिश, गुजराथी, हिन्दी, कानडी, मल्याळम, मराठी, तामिळ व तेलूगू. याविषयी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी व यामध्ये सहभागी होण्यासाठी कृपया आपल्या संस्थेच्या प्रमुखांशी संपर्क साधा किंवा आम्हाला पूढील पत्यावर संपर्क करा essay2010@sahajmarg.org

आपण मिशनच्या वेबसाईटवरुन यासंबंधीचे माहितीपत्रक व स्थानिक भाषेतील छोटे पत्रक (इंग्लिश, गुजराथी, हिन्दी, कानडी, मल्याळम, मराठी, तामिळ व तेलूगू) प्राप्त करु शकतात.

“चारित्र्य जीवनाचे रक्षक”
[इ. ६ वी ते ९ वी]

“स्वातंत्र्य म्हणजे परवाना नव्हे तर आपल्यासाठी काय योग्य आहे ते निवडण्याचे शहाणपण होय”
[इ. १० वी ते १२ वी]

“महत्वकांक्षा ते आकांक्षा, मिळवणे ते बनणे”
[स्नातकपूर्व ते स्नातकोत्तर]

## नवीन नियुक्त्या

दि. २४ ऑगस्ट २०१० रोजी गुरुदेवांनी खालील नियुक्त्या केल्या आहेत

बंधू पी.सी.जोहरी
व्यवस्थापक, सिलीगुडी आश्रम

बंधू एस.एस.मुरगोड
व्यवस्थापक, क्रेस्ट, बंगलोर

## पत्रव्यवहारासाठी मार्गदर्शक तत्वे

सगळ्या अभ्यासींना विनंती करण्यात येते की गुरुदेवांशी पत्रव्यवहार करतेवेळी पालन करावयाची मार्गदर्शक तत्वे खालील ठिकाणी उपलब्ध आहेत त्याचे सर्वांनी कसोशीने पालन करावे ही नम्र विनंती.

http://www.sahajmarg.org/resources/correspondence-guidelines

## भाषांतरकर्ते पाहिजेत

एकोज इंडिया समुहाला या वार्तापत्राचे इंग्लिश ते हिन्दी, मराठी, गुजराती, बंगाली, तेलुगू, तामीळ, कानडी व मल्याळम या भाषांमध्ये भाषांतर करण्यासाठी स्वयंसेवकांची गरज आहे. आपल्याला भाषांतराबरोबरच मजकूर टाईपही करावा लागेल.

कृपया आपली पार्श्वभूमी, वेळेची उपलब्धता व संगणक ज्ञान याविषयी in.newsletter@srcm.org या पत्त्यावर माहिती द्यावी.


येलबर्गा

# ज्ञान व साधनेमध्ये वाढ

## उत्तर कर्नाटक

नवीन अभ्यासींसाठी बसवकल्याण, विजापूर, गदग, येलबर्गा, हुबळी, धारवाड, बेलुर, कल्लुर आणि नवनगर येथे अभ्यासी प्रशिक्षण शिबीरांची मालिका आयोजित करण्यात आली होती. स्मृती (SMRTI) ने नवीन अभ्यासींसाठी तयार केलेल्या प्रशिक्षण अभ्यासक्रमाव्यतिरिक्त ध्वनिचित्रफितींच्या सहाय्याने बंधू निजलिंगप्पा, डॉ. गजेंद्र सिंह, बंधू अजित कामत, भगिनी सुजाता नवले, भगिनी गीता डी, बंधू प्रल्हाद पाकनीकर, भगिनी गीता रेशमी आणि बंधू राजु काशमपूरकर यांनी हे कार्यक्रम आयोजित केले.


बसवकल्याण



गदग

प्रशिक्षणामध्ये सहजमार्ग साधनेची मूलतत्वे, ध्यान, शुद्धीकरण, डायरी लेखन, प्रार्थना, भंडारा, संस्थेची उद्दिष्ये, आपल्या गुरूंची ओळख, एस.एम.एस.एफ (SMSF) सारख्या प्रतिसंस्थांची माहिती आणि त्यांचे कार्य, स्मृती (SMRTI), क्रेस्ट (CREST) आणि रिट्रीट सेंटर यांचा समावेश होता.

## आंध्र पदेश

दि. १८ जुलै रोजी कुर्नूल येथे एक पूर्ण दिवसाचा अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम वर्ग १ संपन्न झाला. सुमारे २१ अभ्यासी या कार्यक्रमात सामील झाले होते. मुख्यत्वेकरुन हे सहभागी तरुण व गेल्या वर्षाभरामध्येच ज्यांनी साधना सुरु केली आहे असे होते. अतिशय उत्साहाने या कार्यक्रमाचे स्वागत झाले. गुरुदेवांच्या ध्वनिचित्रफितीमधून सहभागींच्या दैनंदिन जीवनात साधनेमधील बऱ्याच अडचणींचा खुलासा झाल्यासारखे त्यांना वाटले. हा कार्यक्रम खूपच लाभदायक असून या कार्यक्रमाद्वारे एस.एम.एस.एफ (SMSF), क्रेस्ट (CREST), रिट्रीट सेंटर अश्या संस्थांच्या कार्यकलापांचे ज्ञान मिळाल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.


कुर्नूल

दि. ८ ऑगस्ट रोजी ३० अभ्यासींसाठी यम्मिगनुर येथे एक पूर्ण दिवसाचा तेलुगु भाषेतील अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम वर्ग १ संपन्न झाला. यम्मिगनुर हे सुमारे ८० अभ्यासी असलेले नवीन केंद्र आहे. एक वर्ष किंवा अधिक काळापासून ज्यांनी साधना सुरु केली आहे असे अभ्यासी यांत सहभागी होते. या पूर्ण कार्यक्रमामध्ये अभ्यासी परस्पर संवाद साधत होते आणि बऱ्याचजणांसाठी हा त्यांचा अभ्यास सुरु केल्यापासून पहिला प्रशिक्षण कर्यक्रम होता.


यम्मिगनुर

## तामिळनाडू

दि. २५ ते २७ जुलै दरम्यान चेट्टीपालयम, तिरुप्पुर येथील योगाश्रम येथे अभ्यासींसाठी ३ दिवसांचे प्रशिक्षण कार्यक्रम झाले. १९ केंद्रांमधून ६९ अभ्यासी या कार्यक्रमामध्ये सामील झाले होते. तामिळनाडू दक्षिण विभागाचे विभाग प्रमुख, बंधू विश्वनाथ राव यांनी स्वागतपर भाषण केले. तामिळ भाषेतील या प्रशिक्षण कार्यक्रमाचे संचालन बंधू धनुमूर्ति आणि भगिनी रम्या रामप्रभू यांनी केले, यामध्ये सहजमार्ग ध्यानपद्धती, सफाई व प्रार्थना या पैलूंवर जास्त भर देण्यात आला. दुसऱ्या दिवशी बंधू अनंत यांनी 'शिस्त व आज्ञापालन' यावर एक सत्र घेतले आणि त्यानंतर बंधू रवि सुब्बय्या यांनी 'सतत स्मरण' यावर आपले विचार मांडले.


तिरुप्पुर

दुपारच्यासत्रामध्ये डॉ. राधाकृष्णन 'श्रद्धा' या विषयावर बोलले. तिसऱ्या दिवशी सत्संगानंतर भगिनी रम्या यांनी '१० नियम' हा विषय समजावून सांगितला. कार्यक्रमाची सांगता बंधू विश्वनाथ व बंधू प्रकाश यांच्या प्रेरणादायी भाषणाने झाली. या कार्यक्रमाने खूपच फायदा झाल्याचे मत सहभागींनी व्यक्त केले.

श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

# खाजगी मेळावा व खुले चर्चासत्र

## गुलबर्गा, उत्तर कर्नाटक

दि २३ जून रोजी भगिनी राधाबाई कुलकर्णी यांच्या निवासस्थानी एका खाजगी मेळाव्याचे आयोजन केले गेले. ६ इच्छुकांनी या कार्यक्रमात भाग घेतला. भगिनी मीरा कुलकर्णी यांनी सहजमार्गाच्या अनेकविध विषयांवर भाष्य केले. बंधू मनोहर सिंह यांनी प्रश्नोत्तराच्या सत्राचे संचालन केले. त्याच दिवशी ४ इच्छुकांनी साधनेला सुरुवात केली. या संपूर्ण वेळेमध्ये घरामध्ये एक आनंदाचे वातावरण होते.

दि. ११ जुलैच्या सायंकाळच्या सत्संगानंतर गंगावती तालुक्यातील येलबर्गा येथे एका खुल्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. १० इच्छुकांनी या कार्यक्रमात भाग घेतला. बंधू काशमपुरकर, बंधू राजुलाल, आणि बंधू व निजलिंगप्पा हे या प्रसंगी बोलले. स्थानिक प्रशिक्षक बंधू रुद्राप्पा हे ही या प्रसंगी उपस्थित होते. जवळपास सर्वांनीच साधनेची सुरुवात करण्याकडे रुची दर्शविली.

## चिक्कमंगळूर, दक्षिण कर्नाटक

दि. १५ ऑगस्ट रोजी चिक्कमंगळूर केंद्राचे अभ्यासी व काही इच्छुक एका अभ्यासीच्या घरी जमा झाले. बंधू सत्यनरायण यांनी इच्छुकांना ३M विषयी माहिती सांगितली ज्यामुळे अभ्यासीदेखील प्रेरित झाले.
गुरुदेवांवर आधारित एक ध्वनिचित्रफीत दाखविली गेली व त्यानंतर साधनेच्या निरनिराळ्या विषयांवर उपस्थित अभ्यासींनी भाष्य केले. भगिनी मीना यांनी चिक्कमंगळूर येथील एका अभ्यासीच्या फार्म हाउसला गुरुदेवांनी दिलेली भेट यावरील 'सहज दीप' च्या एका जुन्या आवृत्तीतील एक लेख वाचून दाखविला. यामुळे प्रेरित होऊन बंधू के. उ. शेट्टी यांनी काही उदाहरणांसमवेत गुरुदेव अभ्यासींसाठी कसे चिंतित असतात हे सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी अभ्यासींना ध्यानामध्ये बसावयास सांगण्यात आले व आपण संस्थेच्या कार्यामध्ये कसा हातभार लावू शकू यावर विचार करण्यास सांगण्यात आले. चिक्कमंगळूर येथे एक आश्रम असावा असेदेखील सुचविण्यात आले.

# एक यशस्वी पूर्ण दिवस


त्रिशुर


इंदोर


हसन

## त्रिशुर, केरळ

दि. ४ जुलै रोजी योगाश्रम, त्रिशुर येथे एका पूर्ण दिवसाच्या सत्संगाचे आयोजन केले गेले होते. सकाळच्या ध्यानानंतर मुलांनी 'प्रामाणिकपणा' व 'खरेपणा' यावर एक नाटिका प्रस्तुत केली. या नाटिकेतील राजा आपल्या नागरिकांमध्ये एका प्रामाणिक नागरिकाचा शोध करीत असतो, या कथेमधुन आपल्या दैनंदिन जीवनामध्ये विश्वास व प्रामाणिकपणा यांची मूल्ये प्रस्तुत केली गेली. ज्या उत्साहाने मुलांनी ही नाटिका प्रस्तुत केली त्यावरुन त्यांनी ही मूल्ये आपल्या जीवनामध्ये कशाप्रकारे अंगिकारली आहेत व ते भावी पिढीचे सहजमार्गाचे साधक आहेत हे दिसत होते.

त्यानंतर 'दु:ख हे अध्यात्मिक मार्गाचाच एक भाग आहे' हे स्पष्टीकरण करणाऱ्या गुरुदेवांच्या भाषणाची चित्रफीत दाखविली गेली. केंद्र प्रमुख बंधू टी. पी. नारायणन यांनी गुरुदेवांच्या भाषणाचा मल्याळी भाषेमध्ये अनुवाद करुन सांगितला. 'व्यक्तिमत्वाचे प्रकटन' या पुस्तकामधील अनेक भाषणांचा सार अभ्यासींनी मांडला. १९९३ मध्ये प्रथम प्रकाशित झालेले हे पुस्तक कदाचित पाश्चिमात्य लोकांसाठी संदेश होते. परंतु २००९ मध्ये पुन:प्रकाशित झालेले हे पुस्तक आज साऱ्या विश्वासाठी लागू होते. आजच्या आपल्या दैनंदिन जीवनामध्ये मूल्यांचे आचरण कसे करु शकतो हे पुस्तकामध्ये संगितले आहे. एकंदरीत हे पुस्तक मूल्याधारित जीवनसरणीचा पायबंद असणाऱ्या दहा नियमांची सविस्तर व्याख्या करते. कार्यक्रमाची सांगता सायंकाळच्या सत्संगाने झाली.

## दहा नियमांवर चर्चा, इंदोर.

इंदोर केंद्राच्या सुमारे २७ अभ्यासींनी दहा नियमांवर चर्चा व त्यांचा अवलंब करण्याकरिता एक गट बनविला आहे. हे अभ्यासी नियमीतपणे एकत्र येऊन एका नियमावर चर्चा करतात व त्यानंतर ते त्यावर अंमल करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना स्वत:मध्येच एक अद्वितीय उत्साह जाणवतो. याचे समन्वयाचे कार्य बंधु अविनाश करमरकर व बंधु राजेश रावरेकर करतात.

## हसन, द. कर्नाटक

रविवार दि. ११ जुलै रोजी बंधू श्रीनिवास व बंधू सुब्रमन्या यांना हासन येथे पूर्ण दिवसाचा कार्यक्रम करण्यासाठी निमंत्रित केले होते ज्यामध्ये हासन व चिक्कमंगळूरचे सुमारे ६० अभ्यासी सामील झाले होते.

सत्संगानंतरच्या पहिल्या सत्रामध्ये बंधू श्रीनिवास यांनी सहज मार्ग साधना, पद्धती व गुरुंचे महत्व समजावून सांगितले. दुसऱ्या सत्रामध्ये बंधू सुब्रमन्या यांनी चरित्र निर्माण व दहा नियमांना आपल्या जीवनात बाणवण्याचे महत्व सांगितले.

दुपारनंतर अभ्यासींना त्यांच्या दैनंदिन जीवनात साधनेमध्ये येणाऱ्या अडचणींचा खुलासा करणारा प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. काही अभ्यासींनी आपले अनुभव सांगितले आणि कार्याक्रमाची सांगता सायंकाळच्या सत्संगाने झाली.

श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र
सप्टेंबर २०१०
खंड ३ अंक ५


बंगलोर


गाझियाबाद

## गट चर्चा, मोरादाबाद

दि. १५ ऑगस्ट रोजी, मोरादाबाद केंद्रातील 'योगाश्रमाच्या' ध्यानकक्षामध्ये एका गट चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. सत्संगानंतर आयोजित केलेल्या या चर्चेमध्ये सुमारे ३० अभ्यासी सहभागी झाले होते. अभ्यासींना ७ वेगवेगळ्या गटांमध्ये विभागण्यात आले होते व समन्वयकाचे काम बंधू अमीत यांनी केले. चर्चेसाठी पूज्य गुरुदेवांचे लखनऊ येथील भाषण, सेवा व स्वयंविकास हे विषय दिले होते. प्रत्येक गट आपल्या चर्चेचा सारांश व निष्कर्ष याविषयी काही मिनीटे बोलला. सहभागींना जाणवले की हे अतिशय उपयोगी असे सत्र होते ज्यामध्ये बंधूभाव, प्रेम व गुरुदेवांप्रती कृतज्ञता ओतप्रोत भरली होती.

## बंगलोरच्या स्वयंसेवकांचा संस्मरणीय सप्ताह शेवट

बंगलोर केंद्राला परमधाम, विभागीय आश्रम व बनशंकरी असे तीन आश्रम आशिर्वादरुपाने लाभले आहेत. प्रत्येक आश्रमामध्ये अभ्यासींना काही काळ व्यतीत करण्याची संधी मिळावी या उद्देशाने 'सेवाकार्यात भाग घ्या व अध्यात्मिक वातावरणाचा लाभ घ्या' हा कार्यक्रम सप्ताहाच्या शेवटी आयोजित करण्यात आला होता. पहिला कार्यक्रम विभागीय आश्रमामध्ये जून महिन्यात व त्यानंतर बनशंकरी आश्रमामध्ये दि. १० व ११ जुलै रोजी झाला होता.

अभ्यासींनी अनेकविध कामांमध्ये भाग घेतला जसे ध्यानकक्ष व आसपासच्या परिसराची स्वच्छता, नाश्ता व जेवण तयार करणे. दिवसाच्या दुसऱ्या भागामध्ये सेवेचे अनेकविध अंगे व सेवाकार्य करित असतांना दृष्टीकोन कसा असावा यांवर प्रकाश टाकणारा कार्यक्रम सादर करण्यात आला. रवीवारी सत्संगानंतर बंगलोर केंद्रामध्ये सुरु असणाऱ्या विविध कार्यांविषयी माहिती देणारे सादरीकरण करण्यात आले ज्यानंतर अभ्यासी या कार्यांमध्ये भाग घेण्यासाठी अधीर दिसत होते.

परमधाम येथे दि. १३ ऑगस्ट रोजी संध्याकाळी या कार्यक्रमाची सुरुवात झाली. पुढील दोन दिवस जवळपास ३० स्वयंसेवक मुलांसाठी बगीचा बनविण्यासाठी जागा स्वच्छ करण्याचे काम, पावसाचे पाणी शुद्ध करण्याचे संयंत्र व पाण्याच्या टाक्या स्वच्छ करण्याचे काम, स्वयंपाकाचे सामान साठवून ठेवण्याच्या खोलीतील सामान निट लावणे, ध्यानकक्ष स्वच्छ करणे व भाजीपाला लागवडीची जागा साफ करणे इत्यादी कामे अतिशय उत्साहाने करित होते.

दुपारच्या जेवणाअगोदर सगळ्या स्वयंसेवकांनी पूज्य गुरुदेवांची 'सेवा' ही ध्वनिचित्रफीत पाहिली. जेवणानंतर त्यांनी जवळच असलेल्या निसर्गरम्य तलावावर थोडावेळ घालवला व एकमेकांना अधिक चांगल्याप्रकारे जाणून घ्यायचा प्रयत्न केला. काही अभ्यासींनी भंडाऱ्यातले व पूज्य गुरुदेवांसोबतचे आपले काही अनुभव सांगितले. रात्री पेटवलेल्या शेकोटीने जणू सगळ्यांची हृदये प्रज्वलीत केली होती. यावेळी लहान मुलांनी मनसोक्त गाण्याचा आनंद घेउन उपस्थित अभ्यासींनादेखिल आनंदित केले. रात्रीच्या जेवणानंतर एक चित्रपट दाखविण्यात आला.

दुसऱ्या दिवशी सकाळचा सत्संग झाल्यावर केंद्रप्रमुख बंधू प्रभाकर यांनी एक प्रेरणादायी भाषण देऊन बैठकीचा समारोप केला. या कार्यक्रमाने वेगवेगळ्या भागातील सर्व स्वयंसेवकांना एकत्र भेटण्याची व विचारांचे आदानप्रदान करण्याची एक संधी उपलब्ध करुन दिली ज्यामुळे अनेक अडचणी व शंका वेगवेगळ्या दृष्टीकोनातुन येणाऱ्या अनेक कल्पनांनी तेथेच दूर करता आल्या.

## युवावस्थेचा खास काळ, गाझियाबाद

दि. २६ व २७ जून रोजी गाझियाबाद केंद्राने तरुणांसाठी दोन दिवसीय निवासी युवा मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्याची मध्यवर्ती कल्पना युवा:प्रतिज्ञा व प्रयत्नांची वेळ ही होती. बंधू महावीरसिंग रोहीला यांनी स्वागतपर भाषण केले व त्यानंतर युवावस्थेवरील गुरुदेवांचे एक भाषण ऐकवण्यात आले. त्यानंतर भगीनी प्रिती यांनी 'प्राधान्य देण्यास शिका' हा एक खेळ घेतला. जेवणानंतर भगीनी अनिता यांनी अनेक उत्कंठावर्धक खेळ घेतले. दुसऱ्या दिवशी सत्संगानंतर 'द सिक्रेट' नावाचा विचारांच्या शक्तीविषयीचा एक माहितीपट दाखवला गेला. त्यानंतर भगीनी अनीता यांनी 'समाज व निसर्गाप्रती' तरुणांची जबाबदारी या विषयावर एक सादरीकरण केले. बंधू जतीन यांनी मनाचे नियमन या विषयावर एक छोटेखानी खेळ घेतला व नंतर गुरुदेवांच्या भाषणांमधील काही उतारे सादर केले. सहभागींतर्फे हा कार्यक्रम चांगलाच वाखाणला गेला.

## जम्मू – एका नवीन केंद्रातील घडामोडी



वनमहोत्सव मोहीमेचा एक भाग म्हणून नवीन खरेदी केलेल्या जमीनीच्या तुकड्यावर दि. १५ ऑगस्ट रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जुलै २०१० मध्ये कुंपणाच्या भिंतीचे काम पूर्ण झाले होते. आश्रमासाठी विकत घेतलेल्या जमीनीपैकी १ एकर जमीनीवर अर्जुन, बॉटलब्रश, देवदार, कडूलिंब, आवळा, अलेस्टोनिया, पाचसितारा, चिनीगुलाब,

श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

साग, सिल्व्हर ओक, इ. निरनिराळ्या जातींची जवळजवळ ९० झाडे लावण्यात आली. तळपते ऊन असुनही जवळजवळ ३० अभ्यासी यामध्ये सहभागी झाले होते. भोजनगृह, स्वयंपाकगृह व स्वच्छतागृहे यांच्या बांधकामाचा आराखडा गुरुदेवांच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहे.

## दावनगेरे, कर्नाटक – आश्रमाची उभारणी



दावनगेरे केंद्राची सुरुवात हाताच्या बोटावर मोजता येइल एवढयाच अभ्यासींनी झाली आणि आता तेथे एकूण शंभर अभ्यासी आहेत. पूर्वी रविवारचा सत्संग अभ्यासींच्या घरीच होत असे पण आता संख्या वाढल्यामुळे तो एका शाळेत होत आहे. जसजशी केंद्राची वाढ सुरु झाली तसतशी आश्रमाची गरज भासू लागली व हिच गरज प्रत्यक्षात येऊन मिशनसाठी दोन एकर जागा खरेदी करण्यात आली. दि. २ फेब्रुवारी २००९ रोजी भूमीपूजन करण्यात आले व दि. २५ एप्रिल २०१० पासून तेथे सत्संगाची सुरुवात करण्यात आली. ध्यानकक्ष व स्वयंपाकघराच्या आरेखनाने कामाची सुरुवात करण्यात आली. ध्यानकक्षाची जागा व्हरांड्यासह ४५ फुट x ४५ फुट असुन स्वयंपाकघर व कोठीची खोली / ऑफीसची जागा ही ६० फुट x १५ फुट आहे.

ध्यानकक्षाचे बांधकाम जोत्यापर्यंत झाले असून स्वयंपाकघराच्या छताची आखणी केली गेलेली आहे. बांधकामासाठी, पिण्याच्या पाण्यासाठी व बागकामासाठी एक अतिरिक्त नलीकाकूप खोदण्यात आलेला आहे. ६० सागाची झाडे, १० कडूलिंबाची झाडे, १० हिरड्याची झाडे व काही नारळाच्या झाडांची लागवड केली असून या जागेवर हिरवाई आणण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. नवीन आश्रमाचे बांधकाम येत्या ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.



# मुलांसाठी मूल्ये

## हाथरस, मध्यप्रदेश

दि. २७ जून रोजी हाथरस केंद्राद्वारे मुल्याधारित अध्यात्मिक शिक्षणाच्या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ३० मुलांनी अत्यंत उत्साहाने व हिरीरीने भाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात ५ मिनीटांच्या प्रार्थना ध्यानाने झाली. बंधू अरविंद यांनी थोडक्यामध्ये सहजमार्ग व त्याचा आशय याची ओळख करुन दिली. बंधू ऋषिराज सिंग यांनी शारीरिक व्यायाम, स्वास्थ्य व स्वच्छता याचे दैनंदिन जिवनामध्ये काय महत्व आहे याबद्दल मुलांना मार्गदर्शन केले व मुलेही ते अत्यंत लक्षपूर्वक ऐकत होती आणि मुद्दे लिहून घेत होती. बंधू अमित, हरेंद्र व इतर स्वयंसेवकांनी वेगवेगळ्या नाटिकांचे आयोजन केले होते. बुध्यांक, स्पेलिंग बी आणि सामान्यज्ञानाचे खेळ यासारख्या गोष्टी खेळीमेळीच्या वातावरणांत शिकविल्या गेल्या. या ऊन्हाळी शिबीराचा समारोप मुलांना भेटवस्तू देऊन करण्यात आला.

## इंदोर, मध्यप्रदेश



दि. २१ ते २५ जून दरम्यान इंदोर केंद्राने ५ दिवसीय मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये ७० मुलांनी भाग घेतला. याप्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रम आयोजण्याचे हे या केंद्राचे बारावे वर्ष होय. या कार्यक्रमाबरोबरच 'क्ले आर्ट' (कुंभाराची कला), काचेवरील रंगकाम, नृत्य व विस्तवाशिवाय स्वयंपाक या गोष्टींचेही आयोजन करण्यात आले होते.

दिवसाची सुरुवात मिशनच्या प्रार्थनेने झाली. त्यानंतर पाच मिनीटे शांतता पाळण्यात आली व मग योगासने शिकविण्यात आली. पुढील दहा मिनीटे उपयुक्त संदेश देणारी एक चित्रफीत दाखविण्यात आली. त्यानंतर पुढील दोन तासांसाठी मुले आपापल्या कार्यगटामध्ये सामील झाली. या कार्यक्रमातुन मुलांना आपली गोष्ट दुसऱ्यासोबत वाटून घेणे, दुसऱ्याचे कौतुक करणे व इतरांना सहकार्य करणे ही मूल्ये शिकावयास मिळाली.

## पिलिभीत, उत्तर प्रदेश

दि. ११ ते २० जुन दरम्यान १० ते १४ वर्षे वयोगटाच्या मुलांसाठी पिलिभीत केंद्राद्वारे मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षणाच्या उन्हाळी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये सुमारे ४० मुलांनी अत्यंत उत्साहाने भाग घेतला. शिबीराची सुरुवात सकाळी ६.३० वाजता झाली. कार्यक्रमाची विभागणी निरनिराळ्या सत्रांमध्ये करण्यात आली होती. पहिल्या सत्रामध्ये शारीरिक व्यायाम, प्रार्थना व ध्यान याबरोबरच मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमामधील एका विषयाचा समावेश होता. त्याचप्रमाणे वर्तमानपत्र, रहदारीचे नियम, टपालखाते, वक्तशिरपणा, संगणक, स्वास्थ्य या आणि अश्या विविध क्षेत्रातल्या मान्यवरांच्या भाषणांचा व ओळखीचा अंतर्भाव होता. ऑरीगामी, क्राफ्ट, पेंटिंग, गायन, निबंधलेखन व नाटिका या कार्यक्रमांचाही समावेश होता. शिबीराच्या शेवटच्या दिवशी मुलांच्या पालकांना मुलांनी सादर केलेले कलाविष्कार बघण्यासाठी बोलविण्यात आले होते.

श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

# प्रकाशाची केंद्रे

"जीवन शिक्षणाची शाश्वत पद्धत आहे......जीवनामध्ये ते(शिक्षण) संपत नाही. ते अनादी अनंत आहे. आपल्याला माहीत नाही हे शिक्षण केव्हा सुरु झाले, ते कधीही संपणार नाही कारण जसजसे आपण प्रगती करु, प्रगतीच्या अनेक पातळ्या पार करु, आपण काम करणे सुरुच ठेऊ".



## नेतरामपल्ली, तामिळनाडू

नेतरामपल्ली येथील आश्रम आपल्या मिशनला ऑक्टोबर २००४ मध्ये श्री ओमप्रकाश यांच्यातर्फे, जे नंतर अभ्यासी व प्रशिक्षकसुद्धा झाले, भेट देण्यात आला. नेतरामपल्ली आश्रम हे पूज्य गुरुदेवांसाठी त्यांच्या चेन्नई बंगलोर प्रवासादरम्यानचे एक आदर्श मुक्कामाचे ठिकाण झाले आहे. एका सुंदर अशा वातावरणात व डोंगरांनी वेढलेल्या खेड्याच्या मध्यभागी जेथून येलागिरी डोंगररांगा केवळ २० कि.मी. दूर आहेत हा आश्रम स्थित आहे.

या आश्रमाची मूळची एक एकर जमीन ही अरुंद व लंबाकार आहे व याच्या लांबीनुसार बांधलेली आश्रमाची इमारत दुरुन एका युद्धनौकेप्रमाणे दिसते. हा आश्रम कदाचित अगदी थोड्या आश्रमांपैकी एक आहे जो पूर्णत: बांधून व वापरण्यास तयार असतांना आपल्या मिशनला दान करण्यात आला. हा आश्रम अनेक तुकड्यांमध्ये बांधण्यात आला. जेव्हाकधी आर्थिक स्त्रोत उपलब्ध होत असत ते आश्रमाच्या विस्तारासाठी वापरले जात. ज्यावेळी हा आश्रम मिशनला दान करण्यात आला त्यावेळी तयार असलेल्या ध्यानगृहामध्ये सुमारे २००० व्यक्ती बसू शकतील एवढी क्षमता होती तसेच निवासी खोल्यांमध्ये स्वयंपाकघर व भोजनगृहाच्या व्यवस्थेसह सुमारे ५०० व्यक्तींची क्षमता होती. दोन छोट्या इमारतींचे रुपांतर गुरुदेवांच्या निवासामध्ये व वाचनालयामध्ये करण्यात आले.

मिशनच्या अनेक केंद्रांनी व उपकेंद्रांनी वेढलेला हा आश्रम अध्यात्मिक मेळाव्यांसाठी एकत्र भेटण्यासाठी एक आदर्श जागा आहे. येथे होणाऱ्या रवीवार सत्संगासाठी आसपासच्या तिरुपत्तुर, वनियमबडी, वेलुकोट्टाय व पाचूर केंद्रांमधून अभ्यासी येत असतात. याशिवाय महिन्यातून एकदा होणाऱ्या दिवसभराच्या कार्यक्रमासाठी होसूर, कृष्णगीरी, बारगुर, कावेरीपट्टनम, कुप्पम, पानंदूर, जागादेवी, वी.कोटे, अरणी व वेल्लोर येथून सुमारे २०० अभ्यासी उपस्थीत असतात.

ऑगस्ट २००५ मध्ये केरळ विभागासाठीचा प्रशिक्षक मेळावा आयोजित करण्यासाठी तसेच डिसेंबर २००६ मध्ये तीन आठवड्यांच्या आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती प्रशिक्षण कार्यक्रमासाठी गुरुदेवांनी याच आश्रमाची निवड केली होती.

गेल्या दोन वर्षामध्ये आश्रमाच्या दोन्ही बाजूला १.७५ एकर व ०.९४ एकर जमीन खरेदी करण्यात आली आहे. मोठ्या जागेवर भाजीपाला, फळे व फुले यांचे ऊत्पादन केले जाते व हे ठिकाण अभ्यासींकरिता आपली सेवा समर्पित करण्याचे स्थान ठरत आहे जे त्यांना मुख्य प्रवाहामध्ये सामील होण्यास मदत करते. थोडे अधिक ऊत्पन्न मिळवण्यासाठी विकसीत केलेली पपयांची बाग गुरुदेवांच्या प्रशंसेला पात्र ठरली आहे. ते म्हणाले की या देशातल्या सगळ्यात चवदारा पपया आहेत. ईच्छूक हृदयांसाठी नेतरामपल्ली आश्रम हा अध्यात्मिक बाग म्हणून कार्य करित आहे व येणाऱ्या काळामध्ये त्यांच्या प्रगती व संवर्धनासाठी मदत करणे सुरुच ठेवेल.







To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org
© 2009 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.